नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

दिनांक 28/01/2021 (गुरूवार)
(दुपार)

---

## जबर दुखापत

पो.स्टे. खापरखेडा :- अंतर्गत 10 कि. मी अंतरावर चिचोली बाबुलखेडा येथे दिनांक 27/01/2021 चे 22:00 वा. दरम्यान फिर्यादी नामे- गणेश आत्मराम धुर्वे, वय 35 वर्ष, रा. चिचोली बाबुलखेडा याचा मुलगा नामे- विक्की गणेश धुर्वे, वय 25 वर्ष याचे सोबत आरोपी नामे- अंकित धर्मेंद्र कापसे, वय 25 वर्ष, रा. चिचोली बाबुलखेडा याने जुन्या वादाचा कारणावरून फिर्यादी सोबत भांडण करून लालमातीचे कवेलुने त्याचे डोक्यावर मारून गंभीर जखमी केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. खापरखेडा येथे आरोपीविरुध्द कलम 326, 504 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला अटक करण्यात आली असून गुन्हयाचा पुढील तपास पोहवा मेश्राम पोस्टे खापरखेडा मोक्र 9823453169 हे करीत आहे.

## अपघातात मृत्यू

1) पो.स्टे. कोंढाळी :- अंतर्गत 11 कि.मी. खैरी येथे दिनांक 27/01/2021 चे 02:00 वा. दरम्यान फिर्यादी नामे- प्रशांत प्रमोद देशभ्रतार, वय 22 वर्ष, रा. नागसेन वन नागपूर हा मित्र आरोपी चालक नामे- गोलु पाटील(मृतक), वय 27 वर्ष, रा. नागसेन वन नागपूर याचे सोबत एमएच- 49/वाय- 2265 क्रमांकाच्या ॲक्टीवा गाडीवर डबल सिट बसुन नागपुर ते सेलू जि. वर्धा येथे कोंढाळी मार्गे जात होता. त्यादरम्यान मौजा खैरी येथे आरोपी याने त्याचे ताब्यातील ॲक्टीवा गाडी भरधाव वेगाने निष्काळजीपणे चालवुन दगडाला धडक दिली. या अपघातात फिर्यादी याला किरकोळ मार लागला व आरोपी हा स्वताचे मरणास कारणीभुत ठरला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. कोंढाळी येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 337, 304 (अ) भादंवी. सहकलम 184 मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि राम ढगे पोस्टे कोंढाळी मो नं 9518979499 हे करीत आहे.

2) पो.स्टे. भिवापुर :- अंतर्गत 30 कि.मी. मौजा पाहमी शिवार येथे दिनांक 27/01/2021 चे 01:30 वा. दरम्यान मृतक/आरोपी नामे- आकाश डमपींग पेंदाम, वय 26 वर्ष, रा. दुर्गा नगरी उमरेड हा दिं. 26/01/2021 ला मोटरसायकल नविन असल्याने नंबर नव्हता मोटरसायकल पिवळया रंगाची पैशन प्रो. ने चिमूर येथे मामाकडे गेला होता. यानंतर रात्री 10.00 वा. फिर्यादीचे वडीलाला आकाश याचा घरी परत येत असल्याचा फोन आला. परंतू रात्री 12 वाजूनही तो घरी परत आला नाही व पहाटे 2.00 वा. दरम्यान फिर्यादिचे वडील डूलसिंग पेंदाम यांनी फोन करून सांगीतले की, "पाहमी रोडच्या मध्ये निर्माणधीन पूलाचे बांधकाम सूरू असलेल्या ठिकाणी आकाश हा भरगाव वेगाने गाडी चालवत येत असल्याने त्याचे आपले गाडीवर नियंत्रण नसल्यामूळे अपघात झाला. त्याला उपचाराकरीता ग्रामीण रूग्णालय भिवापूर येथे नेले असता तो उपचारा दरम्यान मरण पावला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे- बादल डूलसिंग पेंदाम, वय 20 वर्ष, रा. उमरेड यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. भिवापुर येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 304 (अ) भादंवी. सहकलम 184 मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास सपोनि श्री भस्मे हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर